# अर्पण पत्रिका

ज्यांनी मला शेणाची पाटी व गुराची काठी देण्याऐवजी
लिहिण्याची पाटी-पेन्सिल दिली त्या माझ्या
आई व कै. वडील यांच्या चरणी
अर्पण ......

# निवेदन

मी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो, की **"मराठी ग्रामीण कवितेतील भाषाविचार"** हा लघुप्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ.शिवाजी विष्णू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयातील एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर केला आहे. हा लघुप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

**अभ्यासक**

**(गायकवाड नाथाजी धोंडीबा)**

स्थळ - सातारा

दिनांक -31/ 3 /२००९

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. गायकवाड नाथाजी धोंडीबा** यांनी मराठी विषयातील एम. फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर करावयाच्या **''मराठी ग्रामीण कवितेतील भाषाविचार''** हा लघुप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. **श्री. गायकवाड नाथाजी धोंडीबा** यांनी लिहिलेला लघुप्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारीत आहे. हा लघुप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

**मार्गदर्शक**
**डॉ. शिवाजी विष्णू पाटील**
**छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा**

स्थळ - सातारा

दिनांक - ३१ / ३ / २००९

Prin - J. G. Jadhav
Chh. Shivaji College,
Satara

# CERTIFICATE

This is to certify that, Shri. Gaikwad Nathaji Dhondiba of this college, was a regular student of M. Phil. (Marathi) during the academic year 2007-08 to 2008-09. To the best of my knowledge he bears a good moral character.

Place - SATARA

Date - 30/3/2009

Principal
Chh. Shivaji College, Satara

# मनोगत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत एम. फिल. (मराठी) पदवीसाठी लघुप्रबंधाच्या स्वरूपात मांडण्यासाठी 'मराठी ग्रामीण कवितेतील भाषाविचार' हा विषय निवडला. मी ग्रामीण भागातील विद्यार्थी असल्याने साहजिकच सुरुवातीपासून ग्रामीण साहित्याची आवड होती. एम.ए. ला ग्रामीण साहित्याचा अभ्यास करताना ग्रामीण कवितेच्या भाषेविषयी अनेक प्रश्न मनात निर्माण होत असत. म्हणून या विषयीचा अभ्यास करण्याची उत्सुकता होती. म्हणून एम. फिल. लघुप्रबंधासाठी प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यासाठी डॉ. शिवाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासाची रुपरेषा तयार केली. आज हा अभ्यास पूर्णत्वाकडे जात असल्यामुळे मनाला अतीव आनंद होत आहे.

मला सुरुवातीपासून फक्त मार्गदर्शनच नव्हे तर पदोपदी समजून घेणारे गुरुवर्य डॉ. शिवाजी पाटील यांचा मी आयुष्यभर ऋणी राहीन. रयत शिक्षण संस्थेचे सचिव व छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य मा. श्री. जे. जी. जाधव, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. भाई एस. एम. पाटील, भाई शहाजी पाटील, छत्रपती शिवाजी कॉलेजच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी, 'कमवा व शिका' योजनेचे सर्व मित्र, 'वीरश्री' चे सर्व मित्र, डॉ.शिवलिंग मेनकुदळे, प्रा.महेश गायकवाड, प्रा.सुनील शिंदे, नंदकुमार शेडगे, दीपक गायकवाड, संदेश पवार यांचा मी आभारी आहे.

माझे वडील कै. धोंडीबा गायकवाड, आई श्रीमती केराबाई गायकवाड, लहान भाऊ सतीश गायकवाड यांच्या प्रोत्साहनामुळेच मी हा अभ्यासविषय पूर्ण करु शकलो.

सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी व कॉम्प्युटर टायपिंग करून देणारे मे.रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री. मुकुंद ढवळे व त्यांचे सहकारी यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

हा अभ्यास करत असताना साहाय्यभूत झालेले माझे सर्व गुरुवर्य, अनेक व्यक्ती, ग्रंथालये, सहकारी मित्र-मैत्रिणी, नातेवाईक या सर्वांचेच शतश: आभार !

**(गायकवाड नाथाजी धोंडीबा)**

# भूमिका

१९६० नंतरच्या काळात मराठी साहित्यात अनेक नवीन प्रवाह उदयास आले. या नवीन प्रवाहांनी मराठी साहित्य विकसित करण्याचे काम केले. या प्रवाहांमुळे अनेक परिवर्तने घडून आली. आजपर्यंत अस्पर्शित राहिलेल्या समाजाचे धगधगीत वास्तव जगासमोर येत आहे.

श्री. म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' जाणले व या उपेक्षितांच्या व्यथांना वाचा फोडली. १९६० नंतर कथा, कादंबरी, कविता, ललितलेख या विविध रूपातून हे ग्रामीण साहित्य बहरू लागलेले आहे. ग्रामीण कविता हा ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाची सुरुवातीची अवस्था होती. केशवसुतांच्या कवितेपासून थोड्याफार प्रमाणात ग्रामीण कविता येत होती. पण त्याही अगोदर म. फुले यांच्या 'अखंड' मधून ग्रामीण स्थितीचे वास्तव दर्शन आपणास घडते.

१९३५ साली ग. ल. ठोकळ यांनी समकालीन कवींच्या कविता संपादित करून 'सुगी' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. यावेळी खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याची सुगी सुरू झाली. प्रारंभीच्या काळापासून या कवितेच्या भाषेविषयी चर्चा होत होती. बेहरे, घुले, खांडेकर, नारखेडे, गिरीश, कानेटकर असे प्रतिभावंत या भाषेच्या संदर्भात उहापोह करत होते पण भाषा हे कवितेचे माध्यम आहे हे विसरत होते. कलावंताच्या मनाचा उत्स्फूर्त आविष्कार त्याच्या साहित्याच्या गरजेनुसार यावा. केवळ वाचक अथवा टीकाकारांच्या इच्छेने नव्हे. हे सत्य १९६० नंतर लक्षात येऊ लागले. आनंद यादवांच्या नंतर कवितेची भाषा कवीच्या बोलीतून प्रादेशिक वैशिष्ट्यासह येऊ लागली. पात्राला बोलते करण्याचे काम या कवितेने केले. बहिणाबाईच्या कवितेची परंपरा पुढे चालू झाली. १९९० नंतरच्या काळात जागतिकीकरणाने बदललेले नवीन संदर्भ कवितेतून येऊ लागले. या भाषेच्या बदलाचा अभ्यास एम.फिल. पदवीसाठीच्या लघुप्रबंधाच्या स्वरूपात मांडला जाणार आहे. १९६० ते आजपर्यंत झालेले प्रमुख कवी व इतर कवी यांच्या कवितांचे कालक्रमानुसार विवेचन केले जाणार आहे.

इतर प्रवाहांच्या मानाने ग्रामीण साहित्य दुर्लक्षले आहे. मराठी साहित्याची समीक्षा फार थोड्या प्रमाणात झालेली आहे. कवितेच्या संदर्भात 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' या विषयावर पुणे विद्यापीठात कैलास सार्वेकर यांनी १९९५ साली पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली आहे. यामध्ये ग्रामीण कवितेच्या ऐतिहासिक अंगाने विवेचन केले आहे. याचप्रमाणे रवींद्र ठाकूर यांचा 'मराठी ग्रामीण कविता' हा लेख 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' या चंद्रकुमार नलगे यांनी संपादित केलेल्या पुस्तकात आलेला आहे.

याशिवाय काही ग्रामीण कवितांच्या संदर्भातील काही लेखात व संपादित पुस्तकात एखाद्या प्रकरणात भाषाविषयाच्या अंगाने थोडाफार विचार झालेला आहे. परंतु ग्रामीण कवितेची भाषा केंद्रबिंदू मानून सखोल चिकित्सा झालेली दिसून येत नाही. याच निकडीतून ग्रामीण कवितेच्या भाषेविषयी अभ्यास करणे हीच या संशोधनामागील भूमिका आहे.

१९६० पासून खऱ्या अर्थाने ग्रामीण कविता बहरलेली दिसून येते. आनंद यादवांच्या 'हिरवे जग' कवितेपासून बहिणाबाईंच्या प्रेरणेने कविता येऊ लागल्याचे दिसून येते. तर १९८० नंतर शिक्षणाची गंगोत्री घरोघरी पोहोचल्याने ग्रामीण कविता अधिक कसदारपणे आलेली दिसून येते. म्हणून १९६० नंतरच्या प्रमुख कवींची व इतर कवींच्या कवितेची भाषा व १९८० नंतरच्या प्रमुख कवींची व इतर कवींच्या कवितेची भाषा अशी विभागणी या कवितेची केलेली आहे. यातून भाषाविषयक विवेचक व विश्लेषण अभ्यास इथे केला आहे.

'मराठी ग्रामीण कवितेतील भाषाविचार' या अभ्यास विषयाचे संशोधन करीत असताना 'सुगी' पूर्व कविता ते आजपर्यंत कविता हा कालावधी लक्षात घेऊन तीन प्रकरणांमध्ये विभागणी केलेली आहे. पहिल्या प्रकरणात ग्रामीण साहित्य व प्रेरणा, ग्रामीण कविता : स्वरूप, वाटचाल यांचे विश्लेषण केले जाणार आहे. तसेच भाषाविषयक झालेली चर्चा याचा उहापोह केला जाणार आहे. दुसऱ्या प्रकरणात साठोत्तरी काळातील कविता व भाषा याचे विवेचन विस्तृतपणे मांडले जाणार आहेत. तिसऱ्या प्रकरणात १९८० नंतर आलेली कविता व भाषेमध्ये झालेले बदल यांचे विस्तृत विश्लेषण केले जाणार आहे. शेवटी उपसंहारात वरील सर्व प्रकरणांत हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी करून ग्रामीण कवितेत येणाऱ्या भाषेसंबंधी विवेचन केले आहे. शेवटी संशोधनात पुरक ठरलेल्या ग्रंथांची संदर्भसूची जोडली आहे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | भूमिका | (v - vi ) |
| १. | ग्रामीण कविता : स्वरूप, वाटचाल व भाषाविषयक चर्चा | १ - ३३ |
| २. | साठोत्तरी ग्रामीण कवितेची भाषा व कविता | ३५ - ६६ |
| ३. | १९८० नंतरची कविता व भाषा | ६७ - १४० |
| ४. | उपसंहार | १४१ - १४८ |
| | संदर्भ ग्रंथसूची | १४९ - १५४ |